**दिनांक २२.०६.२०२२ मा. विभागीय आयुक्त, कोकण यांचे अध्यक्षतेखाली कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या ३७ व्या बैठकीची विषयसूची सकाळी :११:३० वाजता.**

१. **मागील बैठकीचा आढावा.**

| **अ.क्र** | **विषय** | **सविस्तर तपशील** |
|---|---|---|
| १ | पाणथळ तक्रार निवारण समिती अंतर्गत जिल्हा/ नगरपालिका / महानगरपालिके अंतर्गत समिती गठीत करणेबाबत. | • सदर समित्या गठीत करणे संदर्भात सर्व जिल्हाधिकारी, सर्व महानगरपालिका व सर्व नगरपालिका यांनी कार्यवाही करणे.<br>• यासाठी कोणत्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे याची माहिती १५ दिवसांच्या आत समितीकडे सादर करण्याच्या सूचना दिल्या असताना देखील आजपर्यंत माहिती अप्राप्त असल्याने त्यावर चर्चा. |
| २ | नोडल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत | • समितीने पाणथळ समितीच्या बैठकीसाठी नेमलेले प्रतिनिधी / नोडल अधिकारी (शासकीय व अशासकीय / NGO), विशेषत: बृहन्मुंबई महानगरपालिका व पर्यावरण विभाग व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, MCZMA चे प्रतिनिधींना समितीच्या बैठकीत उपस्थित राहणे अपेक्षित आहे. याबाबत परिणामकारकपणे कामकाज पूर्ण करण्यासाठी आवश्यक असल्याने चर्चा. |
| ३ | पाणथळ तक्रारींबाबत डेब्रिज भराव हटविण्याबाबत | • मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार डेब्रिस हटविण्याबाबत संबंधीत महानगरपालिकेने अथवा यंत्रणेने प्राधान्याने उचित कार्यवाही करण्यासाठी आदेश निर्गमित करणे.<br>• तसेच डेब्रिस डंप करण्यासाठी योग्य जागा तपासण्यासाठी सिडको अथवा महसूल अथवा संबंधीत विभागाचे स्थानिक अधिकारी यांनी संयुक्त स्थळपाहणी करुन डेब्रिस डंप करण्यासाठी जागेची निश्चिती करणे. |
| ४ | पोलीस व महसूल यंत्रणेमार्फत कार्यवाही करणेबाबत | • कांदळवन समितीच्या तक्रारींबाबत संबंधीत जिल्हयाच्या पोलीस व महसूल यंत्रणेमार्फत पर्यावरण कायद्या अंतर्गत तक्रार दाखल करण्यात येते, परंतु FIR दाखल केल्यानंतरही सदर जागेवर भराव, डंपिंग अथवा अनधिकृत कामे केली जातात ते तपासून त्यावर उचित कार्यवाही करण्यासाठी चर्चा. |

## कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीमधील प्राप्त तक्रारी

| अ.क्र | तक्रारदार व तक्रारींचा विषय | सविस्तर तपशील | कार्यवाही करणारी यंत्रणा | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. धिरज परब:- जेसल पार्क खाडी पात्रात व किनारी कांदळवन, पाणथळ मध्ये महापालिकेकडून बेकायदा नाले बांधून सांडपाणी सोडणे तसेच कचरा, निर्माल्य प्लॅस्टिक व अन्य साहित्य टाकून पर्यावरणाचा ऱ्हास.. | • या तक्रारी संदर्भात उप आयुक्त (पर्यावरण) मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या दि.२९.०३.२०२२ रोजीच्या अहवालानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जेसल पार्क परिसर सन १९८७-८८ साली विकसीत करण्यात आलेला आहे. तेथील पावसाळी पाण्याचा निचरा करणेकामी रेल्वे समांतर रस्त्यालगत व ओसवाल ऑर्निट ते खाडीपर्यंत पक्क्या स्वरुपात नाले बांधण्यात आले आहे. सदर नाले हे पावसाळी पाणी वाहून जाण्यासाठी असून जेसल पार्क भागातील सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी मलनि:सारण प्रकल्प हे सुमारे २५ वर्षापासून कार्यान्वित आहे. तक्रारीत नमूद नाले हे खूप पूर्वीपासून अस्तित्वात आहे. सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारे नवीन नाल्याचे बांधकाम करण्यात आलेले नाही तसेच सद्यस्थितीत तेथे येणारे मलमिश्रीत पाण्यावर प्रक्रीया करुन खाडीमध्ये सोडत आहेत. सदर मलमिश्रित पाणी कोणत्याही परिस्थित उघडयावर सोडले जात नाही. त्याचप्रमाणे मिरा-भाईंदर महानगरपालिकेने सचिन तेंडूलकर मैदान, नवघर येथे मलनि:सारण केंद्र अंतर्गत येणाऱ्या ९५टक्के काम पूर्ण झालेले आहे. सदर मलनि:सारण केंद्राजवळपास २०० मी. लांबीच्या अंतरावर काही ठिकाणी कांदळवन क्षेत्र येत आहे. या २०० मी. लांबी करिता कांदळवन विभागाने परवानगी दिल्यानंतर कांदळवन क्षेत्रात कोणतीही हानी न होता मलनि:सारण केंद्राचे काम पूर्ण करण्यात येईल. | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका व विभागीय वन अधिकारी, मुं.का.सं.घ | अहवाल प्राप्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | • त्या अनुषंगाने समितीच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. | | |
| २ | श्री. स्टॅलीन डी - दि.३१.०१.२०१९ Please act to stop illegal destruction of wetlands in Wadala /nearby areas. | • जिल्हाधिकारी मुंबई शहर यांनी दिलेल्या अहवालानुसार सदरची जागा ही सॉल्ट पॅन विभागाची असून सदर ठिकाणी ७ मोठे सर्वे नंबर असून सदरचे क्षेत्र हे वन क्षेत्र म्हणून अधिसूचीत करण्यात आले आहे. सदरचे क्षेत्र हस्तांतरीत करण्याबाबत कळविण्यात आले आहे परंतु मा. उच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांमुळे सदचे क्षेत्र हे अद्याप हस्तांतरीत करण्यात आलेले नाही.<br>• तसेच सदर ठिकाणी असलेले भराव हटविण्यासाठी महानगरपालिकेला वारंवार सूचना देऊन सुध्दा सदरची कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे. | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका<br>व<br>विभागीय वन अधिकारी, मुं.का.सं.घ | अहवाल अप्राप्त |
| ३ | श्री. सुनिल अगरवाल व<br>श्री. स्टॅलिन डी. २४.०३.२०१९<br>Drying up of Panje Wetland in Uran & debris dumping in Bhenkhal<br>The Nature Connect Foundation: - Save Panje wetland | • सध्यस्थितीत Panje Wetland तक्रार ही न्याय प्रविष्ठ असल्यामुळे मा. राष्ट्रीय हरीत न्यायालयाच्या (NGT) आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.<br>• तसेच MRSAC, नागपूर यांचेकडून सदरचा भुखंड हा नॅशनल वेटलॅन्ड एटलासमधील आहे किंवा कसे याबाबत अभिप्राय मागविण्याबाबत चर्चा करण्यात आली.<br>• पाणजे आणि भेंणखळ या तक्रारीबाबत **समितीने या तक्रारीबाबत पर्यावरण विभाग (MCZMA) यांच्याकडून उचित कार्यवाही** करुन १५ दिवसात अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | MCZMA | अहवाल अप्राप्त |
| ४ | श्री.धिरज परब - भाईंदरच्या उत्तन येथील एस्सेल ग्रुपने (पॅनइंडिया) कटकारस्थान करून कांदळवनाची प्रचंड तोड व बांध घालून पर्यावरणाचा ऱ्हास केल्या प्रकरणी. | • या तक्रारीबाबत तहसिलदार ठाणे यांनी दि.१९.१२.२०२० रोजी एस्सेल ग्रुप विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>• तसचे या बाबत दोषारोपपत्र पोलीस यंत्रणेच्या सहाय्याने MPCB यांच्यामार्फत दाखल करण्याची कार्यवाही पुर्ण करण्याच्या व केलेल्या स्थळ पाहणी अहवाल अपेक्षीत आहे. | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका<br>व<br>विभागीय वन अधिकारी, मुं.का.सं.घ | अहवाल अप्राप्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | श्री. स्टॅलिन डी दि.२०.०१.२०२०<br><br>Reclamation of Wetlands<br><br>left from Kharigaon toll plaza as one drives from Thane to Kalyan. | • सदर जागेवर अजून २ ट्रेन्च करण्याबाबत तक्रारदार यांकरणेकामी एक सुचवितले होते. त्या अनुषंगाने कांदळनाचे संवर्धन होण्याकरिता एक नैसर्गिक प्रवाह खुला करण्यात आल आहे.<br><br>• ठाणे महानगरपालिकेच्या दि.१७.०६.२०२२ रोजीच्या अहवालानुसार अजून एक नैसर्गिक प्रवाह खुला करुन देण्याबाबत पुढील ट्रेन्च स.नं. ७७ पैकी भागामध्ये आहे. तरी सदर प्रकरणी लांबी ५० मी, रुंदी ६ मी खोली १० मी ट्रेंन्च खोदण्यास परवानगी विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांचेकडून मिळणेबाबत कळविले आहे. | आयुक्त,<br><br>ठाणे महानगरपालिक<br><br>विभागय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक | **अहवाल प्राप्त** |
| ६ | श्री. दामोदर शिंगडा - दि. २९.१२.२०२०<br><br>वसई तालुक्यातील मौजे धोवली येथे पाणथळ क्षेत्रातील समुद्राला लागून असलेल्या सर्वे नं. १०९ ते सर्वे नं.११५ येथील ५० एकर पेक्षा जास्त पाणथळ तिवरे / कांदळवन कापून बेकायदा भराव केल्याबाबत. | या तक्रारी संदर्भात सदस्य सचिव, कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती यांचेमार्फत दि. १८.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये उचित कार्यवाही करण्याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी, कांदळवन कक्ष, पालघर यांना सूचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. | आयुक्त,<br><br>वसई-विरार महानगरपालिका व उपवनसंरक्षक, डहाणू, जि.पालघर व वनपरिक्षेत्र अधिकारी, कांदळवन कक्ष, पालघर | अहवाल अप्राप्त |
| ७ | स्टॅलिन डी. दि.०५.०१.२०२१ Destruciton of Wetlands/CRZ violations/ Bird Trapping/ Encroachments in CRZ१ at Kharghar Sector १६ | • सदर ठिकाणी स्थळ पाहणीवेळी तक्रारदार हे उपस्थित नसल्यामुळे समितीने वन विभागाचे स्थानिक अधिकारी व तक्रारदार यांच्या सोबत स्थळ पाहणी करुन केलेल्या कार्यवाहीचा स्थळ पाहणी अहवाल सादर करण्याच्या सूचना सिडको यांच्या प्रतिनिधींना दिल्या.<br>• या तक्रारी संदर्भात खारघर पोलीस स्टेशन यांचेमार्फत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पुर्ण करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सूचना दिल्या. | उपवनसंरक्षक, अलिबाग, व्यवस्थापकीय संचालक, सिडको व विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, कुर्ला. | अहवाल अप्राप्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | श्री.बी.एन. कुमार दि. २२.०१.२०२१<br><br>Dangerous burial of wetlands at Ghansoli, Navi Mumbai | • या तक्रारीबाबत समितीने जिल्हाधिकारी ठाणे यांना स्थळ पाहणी करुन आवश्यक कार्यवाहीसह अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे व विभागीय वन अधिकारी, मुं.का.सं. घ. | अहवाल अप्राप्त |
| ९ | श्री. स्टॅलिन डी. दि.१५.०३.२०२१<br><br>Dumping of debris on Sawarkhar wetland | • जिल्हाधिकारी रायगड यांच्या अहवालानुसार सदरची जागा ही JNPT ची असल्यामुळे सदर जागेवर अज्ञात इसमाकडून माती काढून त्या मातीचे चौरस बांध टाकून मासेमारीसाठी तलाव बनविण्यात आलेले आहे व स्पीड कंपनिच्या पाठीमागील बाजूस खाडीचा काही भाग असून त्यात डेब्रिज टाकून भराव केलेला आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीचे सदस्य सचिव यांचे मार्फत दि.१८.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर ठिकाणी झालेला भराव हटविण्यासाठी उप प्रबंधक JNPT यांना उचित कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. | जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट | अहवाल अप्राप्त |
| १० | श्री. सुनील अगरवाल<br><br>दि. 04.12.2020 Mangrove, wetlands destruction near Hiranandani Estate Thane. (कांदळवन समिती वर्ग) | • सदर ठिकाणी झालेले बांधकाम हे कांदळवनापासून ५० मी अंतराबाहेर आहे. त्या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या तलावाजवळ बांधकाम करण्यात आले असून तेथे सुशोभिकरणाचे काम चालू आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने वन विभागाचे स्थानिक अधिकारी व तक्रारदार यांच्या सोबत स्थळ पाहणी करुन केलेल्या कार्यवाहीचा स्थळ पाहणी अहवाल प्राधान्याने सादर करण्याच्या सूचना दिल्या. | आयुक्त, ठाणे महानगरपालिका व विभागीय वन अधिकारी, मुं.का.सं.घ., कुर्ला. | अहवाल अप्राप्त |
| ११ | श्री. स्टॅलिन डी, दि. 23.08.2021 Please stop ongoing construction inside Powai Lake, Mumbai. | • सदरचे क्षेत्रावजळील कामाकज बृहन्मुंबई महापालिकेमार्फत असून सदरची जागा ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याचे समजते.<br>• समितीने या तक्रारीबाबत बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या प्रतिनिधींसह व तक्रारदार यांच्या सोबत स्थळ पाहणी करुन योग्य ती कार्यवाही करुन समितीच्या पूढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | बृहन्मुंबई महानगर पालिका व विभागीय वन अधिकारी, मुं.का. सं.घ. | अहवाल अप्राप्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | श्री. निलेश विनायक जोशी :- प्रभाग समिती एच येथील दिवाणमान परिसरातील CRZ Area No Development Zone येथील अनधिकृत बांधकामांच्या यादीत नसल्याबाबतची तक्रार | • सदरची तक्रारीबाबत दि.२१.१२.२०२१ रोजी जिल्हाधिकारी पालघर यांना योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना निर्गमीत केल्या आहेत. | जिल्हाधिकारी पालघर | अहवाल अप्राप्त |
| १३ | श्री. सुनिल अगरवाल :- दि.07.01.2022<br>Illegal blockages of inter tidal water in NRI Wetlands, Sector-60, Nerul Navi Mumbai | • सिडको यांच्या दि. ३०. ११.२०२१ रोजीच्या अहवालानुसार या तक्रारीप्रमाणे NRI (नेरुळ) येथील वसाहती जवळील प्रस्तावित गोल्फ कोर्स जागेजवळील भूखंडाची तक्रारदारांच्या समवेत दि.११.११.२०२१ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली असून सिडको महामंडळाच्या विकास आराखडयाप्रमाणे सदरहू जागा गोल्फ कोर्स प्रकल्पासाठी प्रस्तावित आहे. त्या पॉकेट मधील D व E भागात कोणत्याही प्रकारचे काम चालू नाही व काही भागात पाणी साठलेले आहे. त्या पाण्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भराव केलेला नाही तसेच सदर ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झालेले नाही.<br>• सदरची तक्रार ही सुप्रिम कोर्टात देखील चालू आहे.<br>• त्या अनुषंगाने सदरची तक्रार बंद करण्यास शिफारस करण्यात येत आहे. | सिडको<br>व<br>MCZMA | अहवाल प्राप्त |